# Government Of Maharashtra
महाराष्ट्र शासन

**Office of the Joint Director of Industries, Mumbai Metropolitan Region, Mumbai**

उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई यांचे कार्यालय,

Vikas Centre, 702, 7th Floor, Dr. C.G.Marg, Near Basant Cinema, Chembur (East), Mumbai. 400074.

विकास सेंटर, ७०२, ७ वा मजला, डॉ. सी.जी.मार्ग, बसंत सिनेमागृहाजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई. ४०००७४.

Tel.No. 25206199/25208182 Email: didic.mumbai@maharashtra.gov.in


दिनांक :- ०६.०७.२०२३.

## :- मुंबई शहर निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक दिनांक ०४.०७.२०२३ चे इतिवृत्त -:

मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन समिती गठीत करण्याबाबत, शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक निप्रप-२०२०/ प्र.क्र. २८/ उद्योग-७, दिनांक १९.१०.२०२० मध्ये निर्देश देण्यात आल्यानुसार मुंबई शहराकरिता निर्यात प्रचालन समितीची स्थापना करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांची मान्यता घेऊन तसे समिती सदस्य यांना कळविण्यात आले आहे. राज्यातील निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने व उद्योजकांना येणा-या अडचणीचे निराकरण करण्याकरिता तसेच जिल्हयातील निर्यातवाढीसाठी विविध केंद्र व जिल्हा कार्यालये, औद्योगिक संघटना, निर्यात परिषदा, निर्यात सल्लागार इ. यांच्याशी सातत्याने पाठपुरावा, समन्वय व अडीअडचणी दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेस सहाय्य करण्यासाठी एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनाकरिता मुंबई शहराकरिता उपक्रम राबविण्याबाबत जिल्हा निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०४.०७.२०२३ रोजी दुपारी ०४.०० वाजता मा. जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१. येथे संपन्न झाली.

१. सर्वप्रथम सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती यांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत करुन निर्यात प्रचालन समिती संदर्भात मुंबई शहर जिल्हयाकरिता स्थापन करण्यात आलेल्या निर्यात प्रचालन समिती अंतर्गत करण्यात येणा-या कार्यवाहीबाबत तसेच मुंबई शहराकरिता एक जिल्हा एक उत्पादन प्रकरणी, निर्यात प्रोत्साहनाकरिता तसेच निर्यातवाढीकरिता उपक्रम राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच मागील इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे मा. विकास आयुक्त (उद्योग) यांनी मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना अग्रेषित केलेल्या अर्धशासकिय पत्रात नमूद मुद्यांबाबत कार्यवाहीचा अहवाल (Compliance Report) सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष यांना सादर केला.

**Government Of Maharashtra**
महाराष्ट्र शासन
**Office of the Joint 9Director of Industries, Mumbai Metropolitan Region, Mumbai**
उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
Vikas Centre, 702, 7th Floor, Dr. C.G.Marg, Near Basant Cinema, Chembur (East), Mumbai. 400074.
विकास सेंटर, ७०२, ७ वा मजला, डॉ. सी.जी.मार्ग, बसंत सिनेमागृहाजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई. ४०००७४.
Tel.No. 25206199/25208182 Email: didic.mumbai@maharashtra.gov.in

दिनांक :- ०६.०७.२०२३.

सा द र :-

मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेस सहाय्य करण्याकरिता झालेल्या एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनाकरिता मुंबई शहरकरिता उपक्रम राबविण्याबाबत जिल्हा निर्यात प्रचालन समितीची बैठक दिनांक ०४.०७.२०२३ चे इतिवृत्त मान्यतेस्तव व स्वाक्षरीकरिता सादर,

उद्योग उप संचालक (मुंप्रावि) तथा सदस्य सचिव
जिल्हा निर्यात प्रचालन समिती

मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर तथा अध्यक्ष
जिल्हा निर्यात प्रचालन समिती

२. बैठकीसाठी उपस्थित प्रतिनिधी यांनी विषयासंदर्भात खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले.

| क्रमांक | प्रतिनिधी | उपस्थित केलेले मुद्दे |
|---|---|---|
| १. | उद्योग उप संचालक (मुंप्रावि) तथा सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई उपनगर, मुंबई. | * मुंबई शहराकरिता जिल्हयातील निर्यात प्रोत्साहनाकरिता जागेशिवाय तसेच जागेसहीत ठिकठिकाणी मेळावे घेण्याबाबत जिल्हास्तरावरुन सहकार्य मिळण्याबाबत सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष यांना विनंती केल्याप्रमाणे सदर प्रकरणी मा. अध्यक्ष यांनी जिल्हयातील सर्व निर्यात प्रोत्साहन परिषद यांनी तसेच औद्योगिक संघटना यांचे सहकार्य घेण्यात येऊन सदर प्रकरणी विदेश व्यापार महानिदेशालय, भारतीय निर्यात संस्था फेडरेशन यांचेमार्फत तज्ञ प्रशिक्षकांची नेमणूक करण्याबाबत मा. अध्यक्ष यांचेकडून निर्देशित करण्यात आले. तसेच,<br>* मागील वर्षात एक जिल्हा एक उत्पादन प्रकरणी लेदर एक्सपोर्ट, जेम्स अँड ज्वेलरी एक्सपोर्ट यांची निवड करण्यात आली होती. परंतु दिनांक १३.०६.२०२३ रोजी झालेल्या बैठकीत अभियांत्रिकी, बेसिक केमिकल्स, कॉस्मेटिक्स अँड केमिकल प्लास्टिक उत्पादन, कापड उद्योग यांचाही एक जिल्हा एक उत्पादन करिता समावेश करण्याबाबत सदस्य सचिव यांनी सुचविल्यानुसार मा. अध्यक्ष यांनी त्यास मान्यता दिलेली असून मत्स्यव्यवसाय उत्पादनाचाही समावेश करण्याबाबत निर्देशित करण्यात आले. |
| २. | संचालक,<br>अभियांत्रिकी निर्यात प्रोत्साहन परिषद, बी-२०२ व २२०, ऑरस चेंबर्स, विस्तार बीख २ रा मजला, महिंद्रा टॉवरच्या मागे, एस.एस.अमृतवार मार्ग, वरळी, मुंबई. ४०००१३. | * निर्यातदारांकरिता मेळावे घेण्याबाबत संबंधित सर्व निर्यात प्रोत्साहन परिषद यांना जिल्हा निर्यात प्रचलन समिती जिल्हा कार्यालयामार्फत वित्तीय पाठबळ मिळाल्यास सर्व निर्यात प्रोत्साहन परिषद यांचेकडे असलेल्या ज्ञानाचा, माहितीचा अंमलबजावणी होण्याकरिता उपयोग होऊन निर्यातीस प्रोत्साहन मिळू शकत असल्याचे सुचविण्यात आले होते.<br>* त्याबाबत आर्थिक तरतूदी उपलब्ध होण्याकरिता सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष यांना विनंती केल्यानुसार जिल्हा नियोजन अधिकारी यांनी योग्य त्या अटी व शर्तीसह तरतूद उपलब्ध करुन देण्यास हरकत नसल्याचे तसेच भारतीय निर्यात संस्था फेडरेशन यांचेप्रमाणे इतर निर्यात प्रोत्साहन परिषद यांचा समावेश करण्याबाबत निर्देशित करण्यात आले. |
| ३. | संचालक, ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रिज, न्यु एक्सेलसियर बिल्डींग, ६ वा मजला, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई. ०१ | निर्यात प्रोत्साहन परिषद अंतर्गत Buyer & Saler यांचेकरिता आयोजित करण्यात येणा-या कार्यक्रमास ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रिज यांचेतर्फे योग्य ते सहकार्य करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. |

मुंबई शहराकरिता प्रस्तावित निर्यात प्रचालन समिती बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने कार्यवाही होण्याकरिता सदस्य सचिव यांनी एक जिल्हा एक उत्पादन अंतर्गत जिल्हयामध्ये क्लस्टर तयार करण्याचे नियोजित असून त्याकरिता जिल्हा प्रशासनाने जागेसाठी पुढाकार घेण्याबाबत विनंती केल्यानुसार सदर प्रकरणी लेदर इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट कार्पोरेशन, मुंबई. यांनी तसा प्रस्ताव महसूल विभागास सादर केलेला असल्याचे सांगण्यात आले. तसेच देवनार येथील भूखंडास मा. अध्यक्ष यांनी सदस्य सचिव यांना भेट देऊन वस्तुस्थितीदर्शक प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देशित केले. तसेच इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पॅकेजिंग या संस्थेसोबत Product packaging करिता Memorandum of Undertaking करण्याबाबत प्रस्तावित असल्याचे सदरस्य सचिव यांचेकडून सांगण्यात आले. सदर

समिती अंतर्गत निर्यातीसंदर्भात बैठकीस उपस्थित असलेल्या संस्थेस तसेच इतर अन्य संस्थेस काही अडचणी असल्यास त्याचे निराकरण करणे व त्याबाबत माहिती उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई कार्यालयास सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

सभेअंती सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे जाहिर करण्यात आले.

उद्योग उप संचालक (मुंप्रावि) तथा
सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती

मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर तथा अध्यक्ष
जिल्हा निर्यात प्रचालन समिती

- बैठकीस उपस्थित कार्यबल समिती सदस्य :-

| | |
|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर तथा अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई उपनगर, मुंबई. |
| २. | उद्योग उप संचालक (मुंप्रावि) तथा सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई उपनगर, मुंबई. |
| ३. | उद्योग अधिकारी (मुंप्रावि), जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई उपनगर, मुंबई. |
| ४. | मा.जिल्हा अग्रणी व्यवस्थापक,बँक ऑफ इंडिया,बँक ऑफ इंडिया बिल्डिंग, १ ला मजला, ७०-८०, एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई - ४००००१. |
| ५. | संचालक, ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रिज, न्यु एक्सेलसियर बिल्डींग, ६ वा मजला, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई. |
| ६. | संचालक, बेसिक केमिकल्स, कॉस्मेटिक्स अँड डायस एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल, झांसी कास्लेट, ४ था मजला, ७-कूपरेज रोड, मुंबई. |
| ७. | संचालक, लेदर इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट कार्पोरेशन, ४५, ५ वा मजला, बॉम्बे लाईफ बिल्डींग, वीर नरीमन रोड, फोर्ट, मुंबई. |
| ८. | संचालक, भारतीय अभियांत्रिकी निर्यात प्रोत्साहन परिषद, बी-२०२ व २२०, ऑरस चेंबर्स, विस्तार बीख २ रा मजला, महिंद्रा टॉवरच्या मागे, एस.एस.अमृतवार मार्ग, वरळी, मुंबई. |
| ९. | श्री. डॉ. संजय सैनी, शास्त्रज्ञ, दि सिंथेटिक अँड आर्ट सिल्क मिल्स असोसिएशन (SASMIRA) सस्मीरा रोड, वरळी, मुंबई. ४०००३०. |

क्रमांक उससं/मुंप्रावि/मुंबई शहर/जिनिप्रस/बैठक/२०२३/ दिनांक :-

प्रत माहितीस्तव सादर :-

१. मा जिल्हाधिकारी, मुंबई शहर
२. बैठकीस उपस्थित कार्यबल समिती सदस्य, मुंबई शहर.